# प्रकरण पहिले

## औंध संस्थान : पूर्वेतिहास आणि भौगोलिक परिस्थिती

औंध हे दक्षिण महाराष्ट्रातील एक छोटेसे संस्थान होते. छ. संभाजी महाराजांच्या मृत्यूनंतर मराठेशाहीमध्ये केंद्रसत्ता दुर्बल होत जाऊन अनेक सरदार घराणी उदयास आली. औंधचे प्रतिनिधी घराणे हे त्यापैकीच एक होय. प्रतिनिधींचे घराणे जुने सरदार घराणे असले तरी त्याचा भाग्योदय छ. राजाराम व छ. शाहू महाराज यांच्या कारकिर्दिमध्येच झाल्याचे आढळून येते. काळाच्या ओघात प्रतिनिधी घराण्याच्या जहागीरीचे रूपांतर औंध संस्थानात झाले.

प्रस्तुत प्रबंधात विसाव्या शतकातील औंध संस्थानच्या इतिहासाचा अभ्यास करावयाचा आहे. विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात म्हणजेच १९४८ साली संस्थानांचे विलीनीकरण होईपर्यन्त औंध संस्थानात विविध क्षेत्रात झालेल्या घडामोडींचा अभ्यास करणे, प्रगतीचा आढावा घेणे हा प्रस्तुत अभ्यासाचा उद्देश आहे. त्यासाठी औंध संस्थानात सत्तेवर असलेल्या प्रतिनिधी घरण्याचा पूर्वेतिहास, संस्थानच्या भौगोलिक सीमा व प्रादेशिक विस्तार, संस्थानातील वेगवेगळे प्रशासकीय विभाग आणि संस्थानातील भौगोलिक परिस्थिती इत्यादी बाबींची माहिती घेणे आवश्यक ठरते. प्रस्तुत प्रकरणात त्या सर्व मुद्यांचा आवश्यक तेवढ्या विस्ताराने आढावा घेतला आहे.

'औंधच्या प्रतिनिधी घराण्याचा मूळ पुरूष किन्हई गावचा कुलकर्णी त्रिंबक (जन्म ७ डिसेंबर १६६०) याने स्वत:च्या पराक्रमाने राजाराम महाराजांकडून ' प्रतिनिधी ' हे पद मिळविले. छ. राजाराम महाराज ज्यावेळी जिंजीच्या आश्रयास गेले तेव्हा रामचंद्रपंत अमात्य, प्रल्हाद निराजी, परशुरामपंत त्रिंबक यांनी महाराष्ट्रात मोगलांना प्रखर प्रतिकार करून आपले शौर्य व कर्तबगारी दाखविली. त्यामुळे राजाराम महाराज यांनी परशुरामपंत त्रिंबक यास इ.स. १६९८ मध्ये ' प्रतिनिधी ' हे पद देऊन त्यांचा गौरव केला.[१]

औरंगजेबाच्या मृत्यूनंतर छ. शाहू महाराज मोगलांच्या कारावासातून सुटून महाराष्ट्रात आल्यानंतर शाहू व ताराबाई यांच्यात सत्ता संघर्ष सुरू झाला. या संघर्षात परशुराम त्रिंबकाने ताराबाईंचा पक्ष उचलून धरला. ताराबाईंच्या

बाजूने त्याला शाहू महाराजांबरोबर युध्दे करावी लागली. साताराचा अजिंक्यतारा हा किल्ला शाहू महाराजांनी घेतला त्यावेळी शेखमीरा या किल्लेदाराच्या मदतीने शाहू महाराजांनी परशुराम त्रिंबक यास कैद करुन त्यांचे ' प्रतिनिधी ' पद काढून घेतले. त्यानंतर सन १७१० मध्ये परशुरामपंत व शाहू महाराजांचा समेट खंडोबल्लाळ चिटणीस यांनी घडवून आणला. त्यावेळी शाहू महाराजांनी परशुराम त्रिंबकास ' प्रतिनिधी ' पद वंशपरंपरेने दिले. शाहू महाराजांनी ' प्रतिनिधी ' पद देताना जी सनद परशुराम त्रिंबकास दिली तीत शेवटी असे म्हटले आहे -

' अशी महत्कार्ये करुन राज्य रक्षण केले, यास्तव तुम्हावर कृपाळू होऊन ' प्रतिनिधी ' चे पद तुम्हास वंशपरंपरेने वतनी करुन दिले असे. भोसले यांचे वंशी जो कोणी राज्य करील त्याने तुमचे वंशाचे ठायी नमता पुरस्सर विश्वास ठेवून तुमचे वंशी पद चालवावे. यासी अंतर करील त्याचे राज्यास श्रेयस्कर होणार नाही. '[२]

यावरुन परशुरामपंतांच्या योग्यतेची आपणास कल्पना येते. परशुराम-पंत हे शूर, राजकारण कुशल, मुत्सद्दी होते. परशुराम त्रिंबक पंतप्रतिनिधी इ.स. २६ मे १७१८ रोजी सातारा येथे मृत्यू पावले.

श्रीनिवासराव उर्फ श्रीपतराव (१७१८ ते १७४६) :

परशुराम त्रिंबक प्रतिनिधी यांचे तिसरे चिरंजीव श्रीनिवासराव उर्फ श्रीपतराव हे आपले चुलते माधवराव यांस दत्तक गेले होते. परंतु छ. शाहू महाराजांनी हे दत्तक विधान खोटे ठरवून श्रीपतरावास आपणाकडे ठेवून घेतले व ७ जून १७१८ रोजी त्यास ' प्रतिनिधी ' पदाची वस्त्रे दिली. म्हणजे श्रीपतरावास प्रतिनिधीपदाची वस्त्रे परशुराम त्रिंबक प्रतिनिधी यांच्या मृत्यूनंतर मिळाली. परंतु असे असले तरी परशुराम त्रिंबकाच्या शेवटच्या काळात तो

फक्त सल्ला मसलत करीत असे. पण त्याच्यावतीने श्रीपतराव हे प्रतिनिधीपदाची सर्व कामे सांभाळीत होते. म्हणजे परशुरामपंतांच्या उतारवयात प्रतिनिधीपदाची सर्व जबाबदारी ही श्रीपतरावानेच सांभाळलेली होती.

शाहू महाराजांची श्रीपतराव प्रतिनिधी यांच्यावर जास्त मर्जी होती. शाहू महाराजांच्या कारकिर्दीमध्ये त्यांनीही अनेक पराक्रम करून आपली कर्तबगारी त्यांना दाखविली होती. श्रीपतरावचा पराक्रम नजरेत भरतो तो बाळाजी विश्वनाथाने कृष्णराव खटावकराविरुध्द छ. शाहूच्या आज्ञेने काढलेल्या मोहिमेत. श्रीपतराव आपल्या कैदेत असलेल्या पित्याच्या परशुरामपंतांच्या निर्वाणीच्या आज्ञेवरून या मोहिमेत सामील झाला. खटावकराविरूध्दच्या या मोहिमेत त्याने २ डिसेंबर १७११ रोजी चांगलाच पराक्रम गाजवला. त्यामुळेच परशुराम त्रिंबकाची कैदेतून सुटका झाली. कोल्हापूरकर संभाजी विरूध्दच्या मोहिमेत त्याने पराक्रम दाखवून संभाजीच्या बायका व इतर सरदार मंडळीस पकडून शाहूपुढे आणले होते. सिद्दी विरूध्दच्या मोहिमेत त्यांनी ८ जून १७३३ रोजी रायगड किल्ला जिंकून घेऊन महत्वपूर्ण कामगिरी बजावली होती. पहिले बाजीराव पेशवे व श्रीपतराव प्रतिनिधी यांचे पटत नव्हते. मात्र बाजीरावाचे इ.स. १७४० मध्ये निधन झाल्या-नंतर बाळाजी बाजीराव (नानासाहेब) यांना पेशवेपद देण्याची शाहू महाराजांची इच्छा नव्हती. परंतु श्रीपतराव प्रतिनिधींनी आपले वजन खर्च करून बाळाजी बाजीरावास पेशवेपदाची वस्त्रे मिळवून दिली. श्रीनिवासराव उर्फ श्रीपतराव प्रतिनिधी यांचा सातारा मुक्कामी क्षयनाम संवत्सरे शके १६६८ इ.स. २५ नोव्हेंबर १७४६ मध्ये मृत्यू झाला.[३]

जगजीवनराव परशुराम उर्फ दादोबा (१७४६ ते १७५४) :

श्रीनिवास परशुराम उर्फ श्रीपतराव प्रतिनिधी यांचा मृत्यू २५ नोव्हेंबर १७४६ रोजी झाला. श्रीपतराव प्रतिनिधीस पुत्र नव्हता. त्यामुळे प्रतिनिधीपद कोणास द्यावयाचे हा छ. शाहूपुढे प्रश्न होता. श्रीपतरावाने आपल्या हयातीत

आपला बंधू विशाळगडकर प्रतिनिधी कृष्णाजी परशुराम याचा मुलगा अमृतराव कृष्णाजी यास दत्तक घेतले होते. परंतु छ. शाहू महाराजांनी या दत्तक विधानास मान्यता दिली नाही. तसेच पुढे विशाळगडकर प्रतिनिधी गंगाधर कृष्णाजी याचा मृत्यू झाल्यानंतर कोल्हापूर छत्रपती संभाजी याने गंगाधर कृष्णाजीच्या मुलास प्रतिनिधी न नेमता अमृतराव कृष्णाजी यास आपला प्रतिनिधी नेमले होते.[४] त्यामुळे श्रीपतराव प्रतिनिधीच्या मृत्यूनंतर त्याचा धाकटा भाऊ जगज्जीवनराव यास प्रतिनिधीपद देण्याचे छ. शाहू महाराजांनी ठरवले. जगज्जीवनराव यास दादोबा असेही म्हणत असत. या जगज्जीवनराव उर्फ दादोबा यास १७ डिसेंबर १७४६ रोजी प्रतिनिधीपदाची वस्त्रे देण्यात आली.[५] परंतु श्रीपतरावांची कर्तबगारी दादोबामध्ये नव्हती. दादोबा प्रतिनिधी हे शाहू महाराजांची थोरली पत्नी सकवारबाई यांच्या तंत्राने चालणारे होते.

नानासाहेब पेशवे व दादोबा प्रतिनिधी यांचे पटत नव्हते. सातारा छत्रपतींच्या दत्तकाच्या व वारसाच्या प्रश्नाबाबत राणी सकवारबाईने केलेल्या कट कारस्थानात दादोबा प्रतिनिधी सामील होते. परंतु ही सर्व कट कारस्थाने अयशस्वी झाल्याने त्याचे दुष्परिणाम त्यास भोगावे लागले. ता. १५ डिसेंबर १७४९ रोजी सातारा येथे शाहू महाराजांचा मृत्यू झाला. राणी सकवारबाईने सहगमन केले. त्यानंतर नानासाहेब पेशव्यांनी जगज्जीवनराव प्रतिनिधी व त्याचा मुतालीक यमाजीपंत शिवदेव यांना कैद केले. नंतर रामराजाच्या राज्याभिषेकाच्यावेळी प्रतिनिधीची आवश्यकता निर्माण झाल्यानंतर नानासाहेब पेशव्यांनी जगज्जीवनराव प्रतिनिधीस मुक्त न करता कोल्हापूरकर प्रतिनिधी गंगाधर कृष्ण याचा मुलगा भवानराव यांस " श्रीनिवास परशुराम" असे नाव ठेवून त्यांना सातारा छत्रपतींचे प्रतिनिधीपद दिले.[६]

भवानरावांची प्रतिनिधी म्हणून नेमणूक झाली असली तरीसुध्दा प्रतिनिधीचा प्रदेश जगज्जीवनरावच्या फौजांच्या ताब्यात असल्यामुळे भवानराव

हा केवळ नामधारी प्रतिनिधी बनला. पुढे जगज्जीवनरावचा मुतालिक यमाजी शिवदेव याने पेशव्याविरूध्द बंड पुकारले. परंतु ते यशस्वी झाले नाही. त्यातूनच इ.स. १७५० चा सांगोल्याचा तह निर्माण झाला. सांगोल्याच्या तहामुळे मराठ्यांच्या राज्यघटनेत आमूलाग्र बदल झाला. सर्व सत्ता ही पेशव्यांच्या हाती एकवटली. मराठ्यांच्या राजकारणात व राज्यकारभारात छत्रपती व अन्य प्रधान केवळ नामधारी बनले. शाहू महाराजांच्या कारकिर्दीत मराठ्यांच्या राजकारणात व राज्यकारभारात प्रतिनिधींना प्रतिष्ठा होती. त्यांचा दबदबा होता. छत्रपतींच्या खालोखाल प्रतिनिधींचेच स्थान होते. तो कोणत्याही बाबतीत पेशव्याला कमी नव्हता. सांगोल्याच्या तहानंतर मात्र परिस्थिती झपाट्याने बदलत गेली व प्रतिनिधींची मराठ्यांच्या राजकारणातील प्रतिष्ठा नामशेष झाली.[७]

पेशव्याने पुढे ताराबाईंच्या मध्यस्थीमुळे जगज्जीवनराव प्रतिनिधीची कैदेतून सुटका केली. त्यानंतर प्रतिनिधीचा गृहकलह सुरू झाला. त्याबाबत पेशवा मात्र तटस्थ राहिला. त्यामुळे या गृहकलहात जगज्जीवनराव यशस्वी झाला. पुढे त्याने पेशव्याशी तडजोडीचे धोरण स्वीकारले. इ.स. १७५४ मध्ये त्याचे निधन झाले.

श्रीनिवास गंगाधर उर्फ भवानराव प्रतिनिधी (१७५४ ते १७७७) :

जगज्जीवनराव प्रतिनिधी यास त्रिंबकराव हा मुलगा होता. परंतु तो अल्पवयातच मरण पावल्यामुळे जगज्जीवनराव प्रतिनिधी यांच्या मृत्यूनंतर 'प्रतिनिधी' पदाची वस्त्रे त्यांचा चुलत नातू (पुतण्याचे पुत्र) श्रीनिवास गंगाधर उर्फ भवानराव यास २४ आक्टोंबर १७५४ रोजी देण्यात आली.[८]

पेशवे व भवानराव यांचे पटत नसल्यामुळे १७६१ नंतर राघोबादादांनी भवानराव प्रतिनिधी यांच्याकडून प्रतिनिधीपद काढून ते आपला मुलगा भास्करराव यास दिले. यानंतर केवळ चार महिन्यातच भास्करराव मरण पावल्यामुळे

` प्रतिनिधी ` पद नारोशंकर यास दिले. त्यामुळे भवानराव प्रतिनिधी पेशव्याविरुध्द निजामास जाऊन मिळाले. माधवराव पेशव्यांनी हे ओळखून भवानरावास पुन्हा प्रतिनिधीपद दिले. यानंतर भवानरावास इ.स. १७६३ मध्ये शह देण्यासाठी प्रतिनिधी घराण्यात भांडण लावण्याच्या हेतने पेशव्यांनी भवानराव यांचे ` प्रतिनिधी ` पद पुन्हा काढून घेतेले व ते भवानरावांचा चुलत भाऊ भगवंतराव त्रिंबक यास १७६५ मध्ये दिले. त्यानंतर सन १७७४ मध्ये पुन्हा भवानरावास प्रतिनिधीपद मिळाले.[१]

भवानराव प्रतिनिधी हे कर्तृत्ववान, शूर, पराक्रमी होते, नाना फडणवीसाच्या ते खास मर्जीतील होते. नारायणराव पेशव्यांच्या मृत्युनंतर मराठा सरदारांनी जी ` बारभाई ` मंडळाची स्थापना केली होती, त्यामध्ये भवानराव होते. सन १७७७ मध्ये त्यांचा मृत्यू झाला.

<u>परशुराम श्रीनिवास उर्फ थोटेपंत (१७७७ ते १८४८)</u> :

श्रीनिवास गंगाधर उर्फ भवानराव प्रतिनिधी यांच्या मृत्युनंतर त्यांचा अल्पवयीन मुलगा परशुराम यास प्रतिनिधीपदाची वस्त्रे १५ सप्टेंबर १७७७ रोजी देण्यात आली. परशुराम श्रीनिवास हा अल्पवयीन असल्यामुळे नाना फडणवीसाने याचा कारभारी म्हणून कृष्णराव तात्या जोशी सातारकर यास नेमले होते. परशुराम श्रीनिवास हे इ.स. १७९५ च्या खर्ड्याच्या लढाईत आपल्या फौजेसह होते. सवाई माधवराव पेशव्यांच्या मृत्युनंतर मराठेशाहीमध्ये गोंधळ सुरू झाला. कृष्णराव जोशी यांनी कारभारातून अंग काढून घेतले. त्यानंतर प्रतिनिधी घराण्यात परशुरामपंतांची आई काशीबाई व बळवंत फडणीस आणि परशुरामपंत व गणेश काशी कात्रे असा गृह कलह सुरू झाला. यामध्ये दुसरे बाजीराव पेशवे यांनी लक्ष घालून सेनापती बापू गोखले यास परशुरामपंता विरुध्द पाठविले. बापू गोखले यास परशुरामपंता विरुध्द पाठविण्यास दुसरेही कारण

होते आणि हेच कारण प्रमुख असावे, ते म्हणजे दुसरे बाजीराव पेशवे व परशुरामपंत यांचे पटत नव्हते. परशुरामपंतांचे म्हणणे असे की -

" आम्ही छत्रपतींचे नोकर आहोत. बाजीरावाची आज्ञा आम्ही मानणार नाही. छत्रपतीस सुध्दा बाजीराव अन्यायाने वागवीत आहेत सबब त्यासच गाडून टाकले पाहिजे."[१०]

परशुराम श्रीनिवास उर्फ थोटेपंत हा दंगेखोर होता. जवळ रामोशी चाकरीस ठेवून मुलुखात दंगा-धोपा करीत होता. मादक पदार्थाचे व्यसन त्यास जडलेले होते. हा माणसांच्या कानात व नाकात दारू ओतून त्यांचा छळ करीत असे. त्यास तमासगिरांचा छंद होता.[११]

परशुरामपंतांनी पेशव्यांच्या वारणा व निरा नद्यांच्या दरम्यानच्या प्रदेशामध्ये धुमाकूळ घातला होता. बापू गोखले व परशुरामपंत प्रतिनिधी यांची मसूर जवळ कोणेगाव येथे २७ मार्च १८०६ रोजी लढाई झाली. त्यामध्ये परशुराम प्रतिनिधींचा उजवा हात तुटला गेला. अंगावर चौदा जखमा होऊन तो कैद झाला.

पुढे सन १८११ मध्ये बाजीराव पेशव्यांनी परशुरामपंत प्रतिनिधीस कैद मुक्त करून त्यांची मूळ जहागीर १८ लाख रूपयांची त्यापैकी केवळ दोन लाख रूपयांची जहागीर पेशव्यांनी प्रतिनिधीस दिली. तथापि या संदर्भात वेगळी माहिती उपलब्ध झाली आहे. ती पुढीलप्रमाणे - रमा उर्फ ताई तेलीण ही परशुराम श्रीनिवास उर्फ थोटेपंत यांची रखा होती. ती शूर, पराक्रमी स्त्री होती. दुसरे बाजीरावाने बापू गोखले यास परशुरामपंताविरूध्द पाठविले. बापू गोखल्याने परशुरामपंतास पकडून मसूरच्या गढीत ठेवले. बंड मोडून बापू गोखल्याने पुण्याकडे पाठ फिरवताच या बाईने फौज जमा करून वासोटा किल्ला घेतला व परशुरामपंतास कैद मुक्त केले. यावरूनच ' ताई तेलीण मारी सोटा बापू गोखले संभाळ वासोटा ' ही आर्या रूढ झाली आहे.[१२]

इ.स. १८१८ मध्ये पेशवाई नष्ट झाल्यानंतर इंग्रज सरकार व प्रतिनिधी यांच्यात २२ एप्रिल १८20 मध्ये करार झाला. याप्रमाणे प्रतिनिधींचा दर्जा कायम ठेवून त्यांना सातारा छत्रपतींच्या तैनातीस ठेवण्यात आले. १० मे १८४८ मध्ये परशुरामपंतांचा मृत्यू झाला.

श्रीनिवास परशुराम उर्फ रावसाहेब (१८४८ ते १९०१) :

परशुराम श्रीनिवास उर्फ थोटेपंत प्रतिनिधी मृत्यू पावल्यानंतर त्यांनी दत्तक घेतलेला मुलगा श्रीनिवास परशुराम उर्फ रावसाहेब हे ११ जून १८४८ रोजी प्रतिनिधींच्या गादीवर आले. त्यावेळी छत्रपतींचे राज्य खालसा झालेले होते व साताऱ्यात राजमंडळाचा (रिजन्सी कौन्सिल) कारभार चालू होता. पुढे राजमंडळ पूर्णपणे इंग्रजी सत्तेच्या वर्चस्वाखाली गेल्यानंतर इतर संस्थानिकांप्रमाणे प्रतिनिधीही इंग्रज सरकारचे मांडलीक बनले. सन १८५४ मध्ये श्रीनिवास प्रतिनिधींना इंग्रज सरकारकडून औंध संस्थानचे मुखत्यारपत्र देण्यात आले. यावेळी इंग्रजांनी प्रतिनिधींचे राजधानीचे गाव कऱ्हाड हे खालसात सामील केले. त्यामुळे प्रतिनिधींना आपली राजधानी औंध येथे आणावी लागली व येथून पुढे कऱ्हाडकर प्रतिनिधींचे ऐवजी ते औंधचे प्रतिनिधी म्हणून ओळखले जाऊ लागले.[१३]

सन १८५८ पासून ईस्ट इंडिया कंपनीची राजवट बंद होऊन हिंदुस्थानात व्हिक्टोरिया राणीची राजवट सुरू झाली. राणीने जाहीरनामा काढून त्यात संस्थानिकांचे त्यांच्या मुलखावरील हक्क व दत्तक घेण्याचे हक्क मान्य केले. त्यामुळे श्रीनिवासराव प्रतिनिधींचे आसन स्थिर झाले. सन १८७५ मध्ये व्हिक्टोरिया राणीसाहेबांचे चिरंजीव प्रिन्स ऑफ वेल्स हे मुंबईत आले. त्यावेळी दक्षिणेतील संस्थानिकांचेवतीने त्यांना जे मानपत्र देण्यात आले. यामध्ये श्रीनिवासराव प्रमुख होते. श्रीनिवासराव प्रतिनिधींच्या कारकिर्दीपासूनच औंध संस्थानच्या प्रगतीला सुरुवात झालेली दिसून येते.

इंग्रज सरकार दरबारी श्रीनिवासराव प्रतिनिधींचे वजन होते. इंग्रज सरकार त्यांचा फार मान राखीत होते. प्रजेविषयी श्रीनिवासरावांना आत्मियता होती. त्यामुळे लोक त्यांना राजर्षि म्हणत असत. सन २७ सप्टेंबर १९०१ रोजी त्यांचा मृत्यू झाला.[१४]

परशुराम श्रीनिवास उर्फ दादासाहेब (१९०२ ते १९०५) :

श्रीनिवास उर्फ रावसाहेब यांच्या मृत्यूनंतर त्यांचे चि थोरले चिरंजीव परशुराम श्रीनिवास उर्फ दादासाहे हे २० फेब्रुवारी १९०२ रोजी प्रतिनिधी पदावर आले. त्यांच्या कारकिर्दिमध्ये जेकब बापूजी यास इंग्रजांनी संस्थानचे कारभारी म्हणून नेमले होते. दादासाहेबांची कारकिर्द ही अल्प ठरली २७ ऑगस्ट १९०५ रोजी त्यांचा मृत्यू झाला.

गोपाळकृष्ण परशुराम उर्फ नानासाहेब (१९०५ ते १९०७) :

परशुराम श्रीनिवास उर्फ दादासाहेब पंतप्रतिनिधी यांच्या मृत्यूनंतर त्यांचे थोरले चिरंजीव गोपाळकृष्ण परशुराम उर्फ नानासाहेब हे ३ नोव्हेंबर १९०५ रोजी प्रतिनिधी पदावर आले. त्यांचीही प्रतिनिधी पदाची कारकिर्द अल्पशी ठरली. नानासाहेब यांनी कारभारी जेकब बापूजी यांचा खून करण्याचा कट केला असा आरोप ठेवून इंग्रज सरकारने त्यांना १२ सप्टेंबर १९०७ रोजी पदच्च्युत केले.

यानंतर इंग्रज सरकारने औंध संस्थानचा सर्व कारभार आपणाकडे घेतला. त्यानंतर श्रीनिवासरावांचे तिसरे पुत्र भवानराव श्रीनिवासराव उर्फ बाळासाहेब यांना ४ नोव्हेंबर १९०९ रोजी औंध संस्थानचे `प्रतिनिधी` पद इंग्रज सरकार-कडून मिळाले.[१५] बाळासाहेब पंतप्रतिनिधींनी आपल्या कारकिर्दिमध्ये औंध संस्थानचा सर्वांगिण विकास घडवून आणला. औंध संस्थानला दक्षिण

हिंदुस्थानातील एक महत्वपूर्ण संस्थान म्हणून मान मिळवून दिला. स्वखुषीने सर्व सत्ता संस्थानच्या प्रजाजनांच्या हाती देऊन औंध प्रजासत्ताकाची स्थापना करणारे हिंदुस्थानातील बाळासाहेब पंतप्रतिनिधी हे पहिले संस्थानिक होते.

<u>भौगोलिक विस्तार व क्षेत्रफळ</u> :

राज्य विस्तार व भौगोलिक परिस्थितीच्या दृष्टीने पाहता औंध संस्थानचा इतिहास दु:खद आहे. एकेकाळी औंध संस्थानचा विस्तार फार मोठा होता. व हा विस्तार मुलूखगिरीबरोबर वाढत असे. पुढे पेशवाईच्या काळात या संस्थानच्या विस्तारास ओहोटी लागली.

औंधचे प्रतिनिधी यांची मूळ जहागीर १८ लाख रूपयांची होती. परंतु सन १८०६ साली दुसरे बाजीराव पेशवे यांनी परशुराम श्रीनिवासराव प्रतिनिधी यांना कैद करून त्यांची जहागीर काढून घेतली व पुन्हा १८११ साली प्रतिनिधींना जहागीर परत दिली ती केवळ दोन लाख रूपयांची दिली. यापैकी रूपये १,३४,७३७, आणे १४ पैसे ६ जमीन महसूलाबद्दल होती व बाकी रूपये ६५,२६५-१ आणा ६ पैसे नक्त नेमणूकी बद्दल होते.

याप्रमाणे दुसरे बाजीराव पेशव्यांनी केवळ नावाला परशुरामराव प्रतिनिधीस दोन लाखाची जहागीर परत दिलेली होती. तथापि प्रत्यक्ष वसूल रूपये ७५,२४३-२ आणे ७ पैसे खढाच येत असे. या उलाढालीमुळे संस्थानचे फार मोठे नुकसान झालेले होते. पेशव्यांच्याकडून जहागीर परत मिळाल्यानंतरही संस्थानच्या मुलखाचे ब्रिटिश सरकारच्या सोईसाठी तीन वेळा मोबदले झाले. त्यातही संस्थानचे बरेच मोठे नुकसान झाले होते. १८४२ साली पंतप्रतिनिधींचा बागेवाडी महाल ब्रिटिशांनी घेतला व त्याचे मोबदला गुणदाळ तालुक्यातील १७ गावें व कुंडल तालुक्यातील कुंडल व आळसंद ही गावे मोबदला देण्यात आली. सन १८५४ साली पंतप्रतिनिधी यांची कराड ही राजधानी ब्रिटिशांनी स्वत:कडे

घेऊन त्याचे मोबदल्यात क-हाड शेजारची काही गावे देण्यात आली. क-हाड हे गाव खालसात सामील करण्यात आल्यानंतर औंध हे प्रतिनिधींचे राजधानीचे ठिकाण बनले. त्यानंतर सन १८६८ साली किन्हई गाव संस्थानास मोबदला देण्यात आला.

अशाप्रकारे प्रत्येक मोबदल्यात (प्रत्येक बदलाच्यावेळी) राज्यकारभाराची सोय बिलकुल पाहिली न गेल्यामुळे संस्थानचे फार मोठे नुकसान झाले होते. संस्थानचे प्रगतीला ही मोठीच आडकाठी होती.

औंध संस्थानचा मोठा भाग माण, कोरेगांव, खानापूर, क-हाड, तासगांव या सातारा जिल्हाच्या तालुक्यांच्या हद्दीत पसरलेला होता. औंध संस्थानचा दोन तृतियांश ( $\frac{2}{3}$ ) भाग सातारा जिल्हाच्या आग्नेयेस त्याच जिल्हात होता आणि एक तृतियांश ( $\frac{1}{3}$ ) भाग (एक तालुका) विजापूर जिल्हात त्याच्या नैऋत्येस होता. फक्त आटपाडी तालुक्यातील ३२ गावे ही एकास एक लागून सलग अशी होती. इतर तालुक्यातील गावे ही विखुरलेली होती.[१६]

<u>क्षेत्रफळ</u> :

विसाव्या शतकाच्या सुरुवातीस औंध संस्थानचे एकंदर क्षेत्रफळ ५०१ चौरस मैल म्हणजे ३,२०,९६७ एकर इतके होते. यापैकी २,९३,३७७ एकर जमीन लागणीलायक होती. बाळासाहेब पंतप्रतिनिधींच्या कारकिर्दीच्या सुरुवातीस म्हणजे १९०९ साली संस्थानातील फॉरेस्टचे क्षेत्र ४,७६० एकर इतके होते. सन १९२१-२२ मध्ये ते ३,२४८ एकर, १९३५ मध्ये ३,०५८ एकर इतके होते. म्हणजे संस्थानातील फॉरेस्टचे क्षेत्र बदलते होते असे दिसून येते.[१७]

## औंध संस्थानची लोकसंख्या :

श्रीमंत बाळासाहेब पंतप्रतिनिधी १९०९ साली सत्तेवर आले. त्यावेळी संस्थानची लोकसंख्या ६३,९२१ होती. यानंतर १९२१ च्या जनगणनेनुसार ती ६४,५६० इतकी झाली. सन १९३१ च्या जनगणनेनुसार संस्थानची लोकसंख्या ७६,५०७ इतकी होती. तर १९४१ च्या जनगणनेनुसार ती ८८,७६२ होती. अशाप्रकारे तीस वर्षात बाळासाहेबांच्या कारकिर्दीमध्ये लोकसंख्येत वाढ होत गेलेली दिसून येते.[१८]

१९३१ च्या जनगणनेनुसार संस्थानात ३९,६६१ पुरुष व ३६,८४६ स्त्रिया होत्या. जातवार वर्गीकरण पुढीलप्रमाणे होते. हिंदू पुरुष ९७३ व स्त्रिया ९५९, जैन पुरुष ११७ व स्त्रिया ७३, ख्रिस्ती पुरुष ६ व स्त्रिया ५ आणि यहुदी पुरुष ४ व स्त्रिया २. संस्थानातील एकंदर घरांची संख्या १२,५३५ इतकी होती.[१९]

## संस्थानचे सरासरी वार्षिक उत्पन्न :

श्रीमंत बाळासाहेब गादीवर आले (१९०९) त्यावेळी संस्थानचे सर्व बाबींचे मिळून एकंदर सरासरी उत्पन्न रुपये २,७५,९४२-१ आणा ० पैसे इतके होते. त्यामध्ये श्रीमंत बाळासाहेबांच्या कारकिर्दीमध्ये वाढ झालेली दिसून येते. सन १९२१-२२ मध्ये संस्थानचे सर्व बाबींचे मिळून एकंदर उत्पन्न रुपये ३,४७,१८९-१३ आणे २ पैसे, सन १९२९-३० मध्ये रुपये ४,७२,२८१-६ आणे ३ पैसे, सन १९४३-४४ मध्ये रुपये ५,४१,५६०-१ आणा १ पैसे इतके होते. हे आकडे पंचवार्षिक सरासरी उत्पन्न दर्शवितात. याप्रमाणे बाळासाहेबांच्या कारकिर्दीमध्ये पहिल्या दहा वर्षात सरासरीने रुपये ७१,२४७-८ आणे ८ पैसे, वीस वर्षात रुपये १,९६,३३९-४ आणे ७ पैसे व तहत्तीस वर्षात रुपये २,६५,६१८-१ पैसे इतकी उत्पन्नात वाढ झाल्याचे दिसून येते.[२०]

सन १९४८ साली म्हणजे औंध संस्थानच्या विलीनीकरणाच्या वेळेस संस्थानचे एकंदर उत्पन्न ३,५३,००० रुपये इतके होते.[२१]

## खंडणी :

औंध संस्थानास ब्रिटिश सरकार अगर इतर संस्थाने यांना कोणत्याही प्रकारची खंडणी द्यावी लागत नव्हती. उलट संस्थानासच सरदेशमुखी अंमलाबाबत दरसाल अक्कलकोट संस्थानाकडून १,००० रुपये मिळत होते. याबद्दल अ.ना. भागवतांच्या ` साताऱ्याच्या प्रतिनिधी घराण्याचा इतिहास ` या ग्रंथात अक्कलकोट-कराकडून २,००० रुपये मिळत होते असे म्हटले आहे. त्याचप्रमाणे जत संस्थानाकडून बाबती अंमलाबद्दल १,००० रुपये मिळत होते. तसेच ब्रिटिश सरकारकडून दरसाल बाबती अंमलाबद्दल १,००० रुपये मिळत होते.[२२]

## प्रशासकीय विभाग :

### सर्वसाधारण माहिती -

सन १९०९ साली बाळासाहेब पंतप्रतिनिधी गादीवर आले त्यावेळी औंध संस्थानात (१) आटपाडी (२) कुंडल (३) गुणदाळ हे तीन तालुके व (१) ठाणे औंध (२) ठाणे किन्हई (३) ठाणे संगम-माहुली अशी तीन ठाणी होती.[२३] परंतु राज्यकारभाराच्या व खर्चाच्या दृष्टीने तीन ठाणी ठेवणे बरोबर नाही हे लक्षात आल्यानंतर (१) ठाणे किन्हई व (२) ठाणे संगम-माहुली ही दोन ठाणी १९३४-३५ साली औंध ठाण्यात समाविष्ट करण्यात आली. त्याचप्रमाणे कुंडल तालुक्यातील विहापूर, बेलवडे व कोटी ही गावे कुंडल तालुक्यापेक्षा औंध ठाण्यास जवळची असल्यामुळे ती अनुक्रमे १९३०-३१ व १९३२-३३ साली औंध ठाण्यात समाविष्ट करण्यात आली होती. अशाप्रकारे औंध, किन्हई संगम-माहुली व कुंडल तालुक्यातील वरील तीन गावे मिळून १९३५ मध्ये औंध तालुका करण्यात आला.[२४]

याप्रमाणे १) औंध २) आटपाडी ३) कुंडल ४) गुणदाळ असे चार तालुके एकाच दर्जाचे बनविण्यात आले आणि प्रत्येक तालुक्यास स्वतंत्र मामलेदार व फौजदार यांची नेमणूक करण्यात आली. या व्यवस्थेमुळे औंध ठाण्याचा दर्जा वाढला आणि काही गावांची सोय झाली. त्याचप्रमाणे प्रशासकीय खर्चातही बचत होण्यास मदत झाली.

औंध संस्थानचे जे चार प्रशासकीय विभाग वर सांगितले आहेत ते एकाच ठिकाणी आणि सलग असे नव्हते. ते सातारा आणि विजापूर जिल्ह्यात विखुरलेले होते. त्यामुळे संस्थानच्या एकंदर जमिनीचे स्वरूप अमुक एका प्रकारचे होते. संस्थानातील हवामान अमुक प्रकारचे होते असे सांगता येत नाही. त्यासाठी आपणास त्यात्या विभागांचा स्वतंत्र अभ्यास करावा लागतो. तथापि सर्वसाधारणपणे संस्थानचा बहुतेक भाग हा सपाट प्रदेशाचा असून $\frac{2}{3}$ जमीन काळी व $\frac{1}{3}$ जमीन करल अशा स्वरूपाची होती असे म्हणता येईल.

औंध संस्थानच्या प्रशासकीय विभागांची सर्वसाधारण माहिती खालीलप्रमाणे :

<u>औंध तालुका</u> :

औंध हे संस्थानच्या राजधानीचे ठिकाण होते. ते साता-याच्या आग्नेयेस सुमारे ४२ मैलावर असून हे ठिकाण १७°.३२ २५ ३ आणि ७४°.२० पूर्व अशा अक्षांश रेखांशावर आहे. औंध हा संस्थानातील सर्वात लहान तालुका आहे. सन १९३४-३५ मध्ये औंध तालुक्यात एकूण आठ गावे होती. क्षेत्रफळ सुमारे ३० चौरस मैल व लोकसंख्या साधारणपणे ८,००० इतकी होती. औंध हा गांव घाटमाथ्यावर समुद्रसपाटीपासून २८०० फूट उंच असल्यामुळे तेथील हवा समशितोष्ण, शुध्द अशी आहे. औंधच्या दक्षिणेस मूळपीठ देवीची (यमाईदेवी) टेकडी व उत्तरेस श्री नाथाचा डोंगर पूर्वेस मल्लिकार्जुनाची टेकडी आणि शेजारी मावशीबाईचा डोंगर आहे.[२५]

या तालुक्यातील पावसाचे सरासरी प्रमाण ३० ते ३५ इंच इतके होते. या तालुक्यातील बहुतेक जमीन माळरानाची असल्यामुळे पिकाऊ नव्हती. औंध तालुक्यात ज्वारी, बाजरी, गहू, हरभरा ही मुख्य पिके होती. त्याचप्रमाणे ऊस, हळद, भुईमूग ही पिके ही घेतली जात होती. खुद्द औंधमध्ये मोठे कारखाने नव्हते. परंतु लाकडी फर्निचर, पुतळे तयार करणे, सोने-चांदी-पितळ यांचे ओतकाम करण्याचे उद्योग येथे चालत होते. औंधमध्ये दोन छापखानेही होते.

औंध तालुक्यात औंध येथे दर आठवड्यातून मंगळवारी इतर वस्तूंचा तर दर शनिवारी गुरांचा बाजार भरत असे. किन्हई येथे बुधवारी लोकांना आवश्यक असणाऱ्या वस्तूंचा बाजार भरत असे. या ठिकाणी लोकांना खरेदी विक्री करता येत होती.

आटपाडी तालुका :

आटपाडी हा तालुक्यातील मुख्य गाव होता. आटपाडी तालुका हा संस्थानातील इतर प्रशासकीय विभागाच्या मानाने सर्वात मोठा विभाग होता. या तालुक्यातील ३३ गावे अगदी सलग एकास-एक लागून असल्यामुळे सर्वांच्या दृष्टीने हा तालुका महत्वाचा असा होता. आटपाडी तालुक्याचे एकंदर क्षेत्रफळ ३३७.१ चौरस मैल होते. पूर्व-पश्चिम रुंदी २० मैल व दक्षिणोत्तर लांबी ३८ मैल इतकी होती. आटपाडी तालुक्याच्या उत्तरेस सातारा जिल्ह्यातील माण व सोलापूर जिल्ह्यातील माळशिरस हे तालुके, पूर्वेस सोलापूर जिल्ह्यातील सांगोला तालुका, दक्षिणेस सातारा जिल्ह्यातील खानापूर तालुका, आणि पश्चिमेस खानापूर, खटाव व माण हे तालुके होते. सन १९२१ च्या जनगणनेनुसार आटपाडी तालुक्याची एकंदर लोकसंख्या ३३,५१२ इतकी होती. तालुक्याचा एकंदर वसूल रुपये ८३,००० इतका होता.[२६]

या तालुक्याचा पश्चिम व दक्षिण भाग डोंगराळ होता. पूर्वेकडील भाग तितका डोंगराळ नव्हता. मात्र उतरता होता. या भागात डोंगर वगैरे अजिबात नव्हते. पश्चिम आणि दक्षिण भागाकडे डोंगराची एक रांग होती. तिच्यावर श्रीशुक्राचार्यांची टेकडी, भिवघाट, रामघाट, जकाईचा दरा असे लहान मोठे उंचवटे व टेकड्या होत्या. आटपाडी तालुक्यातील निम्मी जमीन काळी, करल व बाकी माळरान अशा स्वरूपाची होती.

आटपाडी तालुका समुद्रसपाटीपासून दूर १८° अक्षांशावर असल्यामुळे या तालुक्याचे हवामान उष्ण पण निरोगी होते. या तालुक्यातील सरासरी पावसाचे प्रमाण २० ते २५ इंच इतके होते. आटपाडी तालुक्यात माण नदी उत्तरेकडून दक्षिणेकडे राजेवाडी, लिंगिवरे, दिघंची, कौठुळी व आटपाडी या भागातून वहात जात होती. या तालुक्यात विहिरीच्या पाण्यावरही काही बागाईत होते. या तालुक्यात जोंधळा, बाजरी, गहू, हरभरा, मटकी वगैरे अठरा कडधान्येही प्रमुख पिके त्याचप्रमाणे हुंडी व मका ही पिके पिकत होती. हा तालुका संस्थानातील इतर तालुक्याच्या मानाने उत्पन्नाच्या बाबतीत प्रथम क्रमांकाचा होता.[२७] या तालुक्यातील लोकांचा शेती हाच प्रमुख व्यवसाय होता. त्याचप्रमाणे हातमागाचा व्यवसाय, घोंगडी बनविणे इत्यादी व्यवसाय येथे चालत होते. आटपाडी तालुक्यात हाणम जातीचे खिलारी बैल, गाई, काटक घोडी, मेंढरे, बकरी, शेळ्या या जनावरांची उत्तम पैदास होत होती आणि यांचा व्यापारही मोठ्या प्रमाणावर चालत होता. या तालुक्यातील आटपाडी येथे दर आठवड्यातून शनिवारी दिघंची येथे रविवारी, करगणी येथे गुरुवारी, खरसुंडी गावी रविवारी व झरे गावी सोमवारी असे बाजार भरत होते. या ठिकाणी लोकांना आवश्यक वस्तूंची खरेदी-विक्री करता येत होती.

सन १९४३-४४ मध्ये आटपाडी तालुक्याचे राज्यकारभाराच्या सोयी-साठी १) पूर्व आटपाडी व २) पश्चिम आटपाडी (खरसुंडी) असे दोन विभाग पाडण्यात आले.[२८]

कुंडल तालुका :

कुंडल हे या तालुक्याचे मुख्य ठाणे होते. कुंडल तालुक्याचे एकंदर क्षेत्रफळ ५७.२ चौरस मैल होते. कुंडल तालुक्याच्या उत्तरेस तत्कालीन सातारा जिल्ह्यातील खानापूर, पूर्वेस व दक्षिणेस तासगाव व पश्चिमेस वाळवा हे तालुके होते. सन १९२१ च्या जनगणनेनुसार कुंडल तालुक्याची लोकसंख्या १७,०४३ इतकी होती. या तालुक्याचा एकंदर वसूल रुपये ७०,००० इतका होता. या तालुक्यातील गावे विखुरलेली होती. यापैकी निम्मी गावे कृष्णा नदीच्या काठी होती. तालुक्यातील बहुतेक जमिनी काळ्या, तांबूस व खडकाळ स्वरूपाच्या होत्या. कृष्णा काठावरच्या गावांच्या जमिनी सुपीक होत्या.[२९] कुंडल तालुक्यातील हवामान पाहिल्यास कृष्णा काठच्या गावांची हवा थंड व बाकीच्या गावांची हवा उष्ण असा प्रकार आढळून येत होता. कुंडल तालुक्यातील पावसाचे सरासरी प्रमाण २० ते २५ इंच इतके होते. या तालुक्यात येरळा, कृष्णा, तारळी या नद्या वहात होत्या. कृष्णा नदीस खोडशी या ठिकाणी पाट बांधलेला होता. या पाटाच्या पाण्यावर या तालुक्यात काही बागाईत केले जात होते. या तालुक्यात ज्वारी, गिडगाप, कृष्णा काठचे गावी शाळूही पिके होत होती. भुईमूग या तालुक्यात जास्त पिकत होता. हा तालुका उत्पन्नाच्या बाबतीत दुसऱ्या क्रमांकावर होता.

या तालुक्यातील लोकांचा मुख्य धंदा शेती होता. त्याचप्रमाणे विणकाम, सुतारकाम, लोहारकाम, चर्मोद्योग इत्यादी व्यवसाय चालत होते. कुंडल येथे प्रत्येक रविवारी बाजार भरत होता.

गुणदाळ तालुका :

सन १८४२ साली इंग्रजांनी प्रतिनिधींचा बागेवाडी महाल घेऊन त्याच्या मोबदल्यात हा तालुका प्रतिनिधींना दिला. तेव्हापासून हा तालुका प्रतिनिधींच्या ताब्यात होता. गुणदाळ हे या तालुक्याचे मुख्य ठाण्याचे गाव होते. या

तालुक्याचे एकंदर क्षेत्रफळ ८०.१ चौरस मैल होते. या तालुक्याच्या उत्तरेस व पूर्वेस विजापूर तालुका दक्षिणेस बागलकोट तालुका, पश्चिमेस बागलकोट तालुका व जमखंडी संस्थानची हद्द होती. गुणदाळ पासून २० मैलावर कोटयाळ हा एक कोटयाळ धनर्गी वगैरे पाच गावांचा वरील तालुक्याचाच भाग होता. त्याची सीमा पूर्वेस व उत्तरेस विजापूर तालुका, दक्षिणेस कुरुंदवाड व जमखंडी संस्थानची हद्द, पश्चिमेस जत संस्थानची हद्द अशा होत्या.[३०]

या भागात डोंगर असा नव्हता. फक्त धनर्गी भागाकडे लहान-लहान उंचवटे होते. या तालुक्याचा उत्तर व पश्चिम भाग उंचवटयाचा होता. तर दक्षिण व पूर्वेकडील प्रदेश उताराचा होता. धनर्गी भागाकडील काही खडकाळ भाग सोडल्यास या तालुक्यातील इतर जमीन काळी व सुपीक होती. गुणदाळ तालुक्यातील हवा उष्ण पण निरोगी होती. आटपाडी व गुणदाळ तालुक्यांतील हवामान सारखेच होते. या तालुक्यातील सरासरी पावसाचे प्रमाण १२ ते १५ इंच इतके होते. या तालुक्यातून कृष्णा व डोण या नद्या वहात होत्या. या नद्यांकाठच्या जमिनी अत्यंत सुपीक होत्या. या तालुक्यात कापूस, जोंधळा, गहू, हरभरा ही मुख्य पिके होती. त्याचप्रमाणे जवस, करडी, तीळ ही धान्ये पिकत असत. उत्पन्नाच्या बाबतीत गुणदाळ तालुका संस्थानात तिसऱ्या क्रमांकावर होता.

शेती हाच या तालुक्यातील लोकांचा मुख्य धंदा होता. त्याच बरोबर सूत कातणे, मीठ तयार करणे, गुरे पाळणे, दुग्ध व्यवसाय इत्यादी व्यवसाय चालत होते. गुणदाळ तालुक्यात गाई, बैल, म्हैशी व रेडे यांची उत्तम पैदास होत होती. या तालुक्यातील जनावरे धिप्पाड व सशक्त अशी होती. या तालुक्यात कोणत्याही गावी बाजार भरत नव्हता. त्यामुळे या तालुक्यातील लोकांना खरेदी-विक्रीसाठी विजापूर व जमखंडी या ठिकाणी जावे लागत होते. गुणदाळ तालुका हा कर्नाटक प्रांतात मोडत असल्यामुळे तेथील लोकांची मातृभाषा कन्नड होती.[३१]

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

औंध संस्थानची भौगोलिक परिस्थिती पाहता संस्थानचा एकंदर मुलुख अत्यंत उडाप्याचा तसेच राज्य कारभाराच्या दृष्टीने अत्यंत गैरसोयीचा असल्याचे दिसून येते. त्यामुळे चार तालुक्यासाठी स्वतंत्र अशी प्रशासकीय व्यवस्था ठेवावी लागत होती. त्यामुळे राज्यकारभाराचा खर्च वाढत होता. शिवाय जादा खर्च करूनही लोकांची व्हावी तशी सोय होत नव्हती. त्याचप्रमाणे हुजूरचे अंमलदारांना तालुक्यास वरचेवर भेटी देऊन तपासणी करण्यास मिळावी तितकी संधी मिळत नव्हती. त्यासाठी संस्थानचा सर्व मुलुख सलग एके ठिकाणी असण्याची गरज तीव्रतेने भासत होती.

श्रीमंत बाळासाहेब पंतप्रतिनिधींनी अधिकार सूत्रे हाती घेतल्यानंतर संस्थान सलग करण्यासाठी बराच खटाटोप केला. संस्थानची अत्यंत लांब व अत्यंत गैरसोयीची असलेली गावे ब्रिटिशांनी घ्यावीत व त्याचे मोबदल्यात ब्रिटिश हद्दीतील संस्थान नजिकची गावे संस्थानास द्यावीत, जेणेकरून संस्थान सलग होईल अशी त्यांनी ब्रिटिश सरकारला अनेकवेळा विनंती केली होती. परंतु अशा बदलास ब्रिटिश गावचे प्रजाजनांची संमती नाही हे कारण सांगून सन १९१६-१७ मध्ये ब्रिटिशांनी बाळासाहेबांची विनंती धुडकावून लावली.

श्रीमंत बाळासाहेबांना संस्थान सलग असण्याची खूप आवश्यकता वाटत होती. परंतु त्यात त्यांना अखेरपर्यन्त यश आले नाही.

## संदर्भ व टिपा

1) गौरव ग्रंथ मंडळ, औंध, शके १८५७, श्री भवानराव गौरव ग्रंथ, भाग २, विभाग १, पृ. ४.

मराठी विश्वकोषाच्या तिसऱ्या खंडात औंध संस्थान संबंधीच्या टिपणात सातारा जिल्ह्यातील किन्हई गावच्या त्रिंबक कृष्णाजी कुलकर्णी यास सन १६९० च्या सुमारास प्रथम `प्रतिनिधीची` वस्त्रे मिळाली असा उल्लेख आहे. तथापि प्रस्तुत लेखकास तो उल्लेख ऐतिहासिक दृष्टया चुकीचा वाटतो.

२) कित्ता, पृ. ५-६.

३) चिटणीस, म.रा., थोरले शाहु महाराज यांचे चरित्र, पृ. १२३

भारत वर्षीय मध्ययुगीन चरित्र कोषात श्रीपतराव यांना सन १७१४ मध्ये प्रतिनिधींची वस्त्रे देण्यात आली असा उल्लेख आहे. तो चुकीचा वाटतो.

४) भारत वर्ष, वर्ष १ ले अंक १ ला, पंतप्रतिनिधींची बखर, पृ. ५३.

५) सरदेसाई गो.स., मराठी रियासत, मध्य विभाग भाग-२, पृ. १०३,
भिडे व्ही.जी., साताराचे श्रीमंत छत्रपती शिवाजी महाराज यांचे वंशाचा व प्रतिनिधी आणि अष्टप्रधानाचा इतिहास, पृ. १२७.

६) भारत वर्ष - वर्ष १, अंक १, पुणे, १८९९, पंतप्रतिनिधींची बखर, पृ. ५५

७) सरदेसाई गो.स., उपरोक्त, भाग-२, पृ. २४९-५०
भागवत अ.ना., साताऱ्च्या प्रतिनिधी घराण्याचा इतिहास, ग्रंथांक २, पृ. २४२-४३.
थोरात दि.शं., मराठ्यांच्या राजकारणातील साताऱ्च्या प्रतिनिधींची कामगिरी, पृ. २२४-३०.

८) भागवत अ.ना., ग्रंथांक १, उपरोक्त, पृ. १३.

९) कित्ता, पृ. १३.

१०) चित्राव सिध्देश्वर शास्त्री (सं.), भारतवर्षीय मध्ययुगीन चरित्र कोष,
पृ. ५०६-७.

११) कित्ता, पृ. ५०६-७.

१२) कित्ता, पृ. ५०६-७.
गौरव ग्रंथ, उपरोक्त, विभाग १, पृ. १५.

१३) भागवत अ.ना., उपरोक्त, भाग-२, पृ. ३०.

१४) भागवत अ.ना., ग्रंथांक १, उपरोक्त, पृ. १३.

१५) औंध संस्थान प्रशासन अहवाल, वर्षे १९०९-१०.

१६) भागवत अ.ना., उपरोक्त, भाग १, पृ. २.

१७) औंध संस्थान प्रशासन अहवाल, वर्षे १९०९-१०, १९२१-२२,
गौरव ग्रंथ, उपरोक्त, विभाग ४, पृ. १.

१८) औंध संस्थान प्रशासन अहवाल, वर्षे १९०९-१०, १९२१-२२, १९३९-४०
१९४३-४४.

१९) गौरव ग्रंथ, उपरोक्त, विभाग ४, प. २.

२०) औंध संस्थान प्रशासन अहवाल, वर्षे १९०९-१०, १९२१-२२, १९२९-३०,
१९४३-४४.

२१) जोशी तर्कतीर्थ श्री लक्ष्मणशास्त्री (सं.) मराठी विश्वकोष, खंड ३,
पृ. ८१-८२.

२२) गौरव ग्रंथ, उपरोक्त, विभाग ४, पृ. २.

२३) औंध संस्थान प्रशासन अहवाल, वर्षे १९०९-१०.

२४) गौरव ग्रंथ, उपरोक्त, विभाग ४, पृ. १६.

२५) भागवत अ.ना., ग्रंथांक १, उपरोक्त, भाग १, पृ. ९

२६) कित्ता, पृ. ७.

२७) कित्ता, पृ. ११.

२८) औंध संस्थान प्रशासन अहवाल, वर्ष १९४३-४४.

२९) भागवत अ.ना., ग्रंथांक १, उपरोक्त, भाग १, पृ. ८.

३०) कित्ता, पृ. ८.

३१) कित्ता, पृ. १३,
गौरव ग्रंथ, उपरोक्त, विभाग ३, पृ. ३८८.